# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - सरगम
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ मंजुषा थावरे

---

असं होतं कधी कधी किंवा बरेचदा,
नाहीच जुळत सूर, प्रयत्न सारे अलाहिदा
अगदी कोमल नकोत, पण सतत तीव्र कशाला ?
वादी संवादी अनुवादी चालेल, विसंवादी कशाला ?

सूर जुळत नाही की नक्षत्र, समजत नाही
नक्की काय चुकतं, सहजी उमगत नाही ।
जगन्मित्र असूनही, एखाद्याशी पटत नाही
बोलघेवडा म्हटले तरी, एखाद्याशीच संवाद नाही ।

होतं खरं असं, पण यावर इलाज गवसत नाही
कळतंय सारं खरंखुरं, पण आतूनच वळत नाही ।

का होतं असं, उत्तर याचं मात्र गवसत नाही
सगळ्यांशी पटतं, याच व्यक्तीशी कधीच का जमत नाही ।

ष मी लावला तरी, निषाद काही पोचत नाही
रंगलेल्या सुरावटीतही, वर्जित स्वर धरत नाही ।

अहीरभैरव, तोडी, सोहोनी, मधुवंती वा बागेश्री
वर्जित स्वराने बिघडते सुरेल सुगम सरगम सूरश्री ।

Anahat Music Therapy